दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ९८ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.५ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

### लाडक्या बहिणींसाठी महत्त्वाची बातमी

# अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन करणार पडताळणी

## दारात चारचाकी दिसल्यास योजनेचा लाभ होणार बंद

**मुंबई (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आता अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका घरोघरी जाऊन पडताळणी करणार आहेत. तुमच्या दारात चारचाकी वाहन असेल, तर अशा लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ सोडावा लागणार आहे. पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविकांच्या पडताळणीत कुटुंबीयांच्या नावावर चारचाकी वाहन असल्याचे निष्पन्न झाल्यास लाभार्थ्यांना अपात्र करण्यात येणार आहे. ही चारचाकी महिलेच्या नावावर नसेल, मात्र कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावावर असेल तरीही त्यांना या योजनेतून अपात्र ठरवले जाणार आहे. यासाठी आजपासून लाडक्या बहिणींच्या घरी जाऊन तपासणी केली जाणार आहे.**



लाडकी बहीण योजना ही राज्यातील सर्वात लोकप्रिय योजनेपैकी एक आहे. या योजनेअतंर्गत राज्यातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. मात्र या अनेक अपात्र महिलाही या योजनेचा लाभ घेत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अशा महिलांना योजनेतून बाहेर काढण्यासाठी अर्जांची पडताळणी सुरु आहे. यासाठी काही निकष लावले जात आहेत. चारचाकी वाहन असणाऱ्या कुटुंबातील महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या महिलांच्या कुटुंबात चारचाकी वाहन असेल त्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येणार नाही.मिळालेल्या माहितीनुसार, कुटुंबातील सासरे, दीर अथवा घरातील इतरांच्या नावावर चारचाकी असेल आणि लाभार्थी महिला पती, मुलांसोबत वेगळी राहत असेल, तर त्यांना या योजनेचा लाभ सुरू राहणार आहे.ज्या महिलांचे कुटुंब आयकर भरते अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. ज्या महिलांकडे चारचाकी वाहन आहे, ते अपात्र ठरणार आहेत. तसेच इतर सरकारी योजनेचा लाभ घेत असणाऱ्या महिलांना फक्त फरकाची रक्कम मिळेल. ज्या महिलांच्या बँक खात्यावरील नाव आणि आधार कार्डवरील नाव वेगवेगळे आहे, अशा महिला देखील अपात्र होणार आहेत. ज्या महिला लग्न करून परराज्यात स्थायिक झाल्या आहेत अशा महिलांनाही आता या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

### फेब्रुवारी महिन्याचा हप्ता कधी मिळणार?

**लाडकी बहीण योजनेचे आतापर्यंत सात महिन्यांचे एकूण १० हजार ५०० रुपये लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. आता फेब्रुवारी महिन्याचा हप्ता पात्र बहिणींच्या बँक खात्यात जमा होणार आहे. आतापर्यंत प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेनंतर हप्त्याचे वितरण सुरू होते. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याचा हप्ता सुद्धा १५ तारखेनंतर मिळण्याची शक्यता आहे.**

# धनंजय मुंडे यांनी दमानियांचे आरोप फेटाळले

## सनसनाटी करून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न

**मुंबई (वृत्तसंस्था)**–अंजली दमानिया यांनी माझ्यावर केलेले सर्व आरोप खोटे आहेत. हे केवळ त्यांच्या स्वभावाप्रमाणे सनसनाटी निर्माण करण्यासाठी केले गेले आहेत. कृषी विभागात मी मंत्री असतानाच्या काळात झालेली सर्व खरेदी ही शासन नियमानुसारच झाली असल्याचा दावा धनंजय मुंडे यांनी केला आहे.

सनसनाटी, धादांत खोटे आरोप करायचे आणि स्वतःची प्रसिद्धी मिळवायची, याव्यतिरिक्त याच्यात मला काहीही आढळत नसल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. गेल्या ५९ दिवसापासून माझ्यावर मीडिया ट्रायल चालू आहे. ते का चालू आहे? कोण चालवतेय? हे मला माहिती नाही, असे देखील मुंडे यांनी म्हटले. यावेळी त्यांनी अंजली दमानिया यांचा अंजली बदनामिया असा उल्लेख करत टोला हाणला.धनंजय मुंडे कृषीमंत्री असताना त्या विभागात मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता.



त्यांच्या या आरोपाला मुंडे यांनी सडेतोड उत्तर दिले आहेत. आम्ही शांत बसलो म्हणजे आम्हाला बोलता येत नाही, असा होत नाही. मुख्यमंत्र्यांचे अधिकार हे मुख्यमंत्र्यांना ऐवजी दमानियांना माहित आहे का? असा प्रश्न देखील मुंडे यांनी उपस्थित केला. अंजली दमानिया यांचा खोटेपणा हा केवळ मला बदनाम करण्यासाठी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अंजली दमानिया यांनी आजपर्यंत केलेले कोणतेच आरोप खरे निघाले नसल्याचेही मुंडे यांनी म्हटले आहे.अंजली दमानिया जेव्हापासून आरोप करतात तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी केलेला एकही आरोप सिद्ध झाला आहे का? असा प्रश्न देखील धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला आहे. या आधी ज्या नेत्यांवर त्यांनी आरोप केले, त्या नेत्यांकडे जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. असे देखील मुंडे यांनी म्हटले आहे. संतोष देशमुख यांचे आरोपी मारले गेले आहेत, असा दावा देखील दमानिया यांनी केला होता. हा देखील दमानियांचा खोटेपणा होता, असे देखील मुंडे यांनी म्हटले आहे. आरोप करण्याचे काम ज्यांनी केले, त्यांना शुभेच्छा. मात्र, माझे राजकीय आयुष्य मायबाप जनतेवर अवलंबून असल्याचा दावा देखील मुंडे यांनी केला आहे.मी मंत्री असताना कृषी विभागात जी प्रक्रिया राबवली गेली ती पूर्ण पूर्व मान्यतेनेच राबवली गेली असल्याचा दावा मंत्री धनंजय मुंडे यांनी केला आहे. त्यामध्ये विविध कंपन्यांकडून स्पर्धात्मक दर मागवले गेले होते. त्यात जास्तीत जास्त कंपन्यांनी सहभाग व्हावे म्हणून दोन वेळा निविदा प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली होती. भ्रष्टाचार करायचा असता तर दोन वेळा मुदत वाढ देईल का? असा सवाल मुंडे यांनी उपस्थित केला.

# आपला पक्ष प्रामाणिकपणे संघटन राबावतो–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे प्रदेश कार्यशाळेत उपस्थिती लावली होती. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधत भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्य नोंदणीवर भाष्य केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपल्या सगळ्यांना याची कल्पना आहे की देशामध्ये भारतीय जनता पार्टी एकमेव असा पक्ष आहे की जो प्रामाणिकपणे आपले संघटन राबवतो. देशात प्रत्येक पक्षाला आपले संविधान तयार करावे लागते ते संविधान निवडणूक आयोगाकडे नोंदणी करावी लागते आणि त्या संविधानाच्या अनुरूप लोकशाही पद्धतीने आपले पूर्ण रचना उभी करावी लागते. आपल्याला कल्पना आहे हे जरी कायद्याने खरे असले तरी अशा प्रकारची संपूर्णपणे लोक तांत्रिक पद्धतीने संविधान अनुरूप व्यवस्था उभा करणारा जर कुठला पक्ष आहे तर तो एकमेव पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष आहे.देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, याच संपूर्ण संघटनेचा भाग म्हणून आपण सुरुवात प्राथमिक सदस्यांपासून करतो. आपल्याला माहित आहे की देशामध्ये प्राथमिक सदस्यतेची मोहीम संपली. सुरू झाली त्यावेळेस आपल्या निवडणुका होत्या आणि म्हणून आपण केंद्रीय भाजपला विनंती केली होती आणि केंद्रीय भाजपने हरियाणा असेल महाराष्ट्र असेल झारखंड या राज्यांना सूट दिली होती की त्यांनी त्यांच्या निवडणुकीनंतर हे करावं. देशभरामध्ये जवळपास संघटन पर्व हे संपुष्टात आले आहे आपल्याला एक्सटेंडेड वेळ मिळाला आहे. आपले प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केंद्राला सांगितले की महाराष्ट्रात दीड कोटी प्राथमिक सदस्य तयार करेल. ज्या वेळेस या पक्षाचा मोठा विस्तार, २०१४ मध्ये आपले अमित भाई शहा हे अध्यक्ष झाल्यानंतर जगातला सगळ्यात मोठा पक्ष भाजपला बनवायचे आहे असा निर्णय घेऊन आपण संघटन बरोबर सुरू केले आणि देशामध्ये ११ कोटी सदस्य केले चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचा सात कोटीचा रेकॉर्ड आपण मोडीत काढला.

# अवैध दारू विरोधी कारवाईत कर्मचाऱ्याचा मृत्यू: कुटुंबाला साडेसात लाख नुकसान भरपाई

### उत्पादन शुल्क मंत्री अजित पवारांची माहिती

**मुंबई (वृत्तसंस्था)**–अवैध दारू विरोधी कारवाईत मृत्युमुखी पडलेल्या नाशिक येथील राज्य उत्पादन शुल्क कार्यालयातील जवान तथा वाहन चालक कैलास गेणू कसबे यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून विशेष बाब म्हणून साडेसात लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकरणांमध्ये सत्वर मदत होण्याच्या दृष्टीने गृह विभागाच्या धर्तीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कायमस्वरुपी धोरण तात्काळ करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी दिली.नाशिक राज्य उत्पादन शुल्क विभाग भरारी पथक क्रमांक १ मधील अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अवैधपणे मद्यविक्री करणाऱ्या ढाब्यावर ७ जुलै २०२४ रोजी रात्री कारवाई केली होती. अवैध मद्यविक्री करणाऱ्या आरोपींच्या वाहनाचा पाठलाग करीत असताना राज्य उत्पादन शुल्क नाशिक यांच्या भरारी पथकाच्या वाहनाला आरोपींच्या वाहनाने धडक दिली व त्यामध्ये जवान तथा वाहनचालक कैलास गेणू कसबे यांचा मृत्यू झाला होता.



उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी या खात्याचा कार्यभार घेताच या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घातले. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सन २०१४ मध्ये गृह विभागाने केलेल्या मदतीच्या धर्तीवर (पोलिस दलातील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय ठरल्याप्रमाणे साडेसात लाख रुपये) राज्य उत्पादन शुल्क विभागातील दिवंगत जवान कैलास कसबे यांच्या वारसांना विशेष बाब म्हणून ७.५० लाख नुकसान भरपाई मंजूर केली आहे.दरम्यान, संबंधित मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबाला विभागाकडून मदत देऊ, अशी घोषणा तत्कालीन उत्पादन शुल्क मंत्री शंभुराजे देसाई यांनी केली होती. तसेच, आमची जी मोहीम सुरू आहे ती अशीच सुरु राहील. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्याचा जीव घेणे योग्य नाही. यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचेही त्यांनी म्हटले होते.

### संजय राऊतांना जादूटोण्यातील जास्त अनुभव

# त्यांच्या आरोपांवर बोलण्याची मला आवश्यकता नाही–उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अद्यापही मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यात राहायला न गेल्यामुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्याकडून टीका केली जात आहे. वर्षा बंगल्याच्या परिसरामध्ये जादूटोणा केल्याचा आरोप त्यांनी केला होता. या आरोपांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केवळ एका वाक्यात प्रतिक्रिया दिली. संजय राऊत यांना त्याच्यातला जास्त अनुभव आहे, याबाबत त्यांनाच विचारा, असा टोला एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांना लगावला.मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प आज जाहीर करण्यात आला. या अर्थसंकल्पाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज माध्यमांशी संवाद साधत प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांना संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांवर प्रश्न विचारला असता, त्यांनी संजय राऊतांच्या आरोपावर बोलण्याची मला आवश्यकता नाही, अशी प्रतिक्रिया देत जास्तीचे बोलणे टाळले.



संजय राऊत यांच्या आरोपांवर बोलण्याची मला आवश्यकता वाटत नाही. संजय राऊत यांना जादूटोण्यातील खूप जास्त अनुभव आहे. त्यामुळे वर्षा बंगल्याबाबत खरे काय आणि खोटे काय हे त्यांनाच विचारा, असे एकनाथ शिंदे म्हणाले.महाराष्ट्रात युसीसी लागू होणार का? असा प्रश्न विचारला असता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आम्ही सर्व जण यावर बसून चर्चा करू. त्यानंतर निर्णय घेऊन असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.मुंबई महापालिकेच्या ठेवी महायुतीकडून मोडल्या जात आहेत, असा आरोप सातत्याने ठाकरे गटाकडून होत आहे. यावरून एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. महापालिकेच्या ठेवी मोडल्या हा विरोधकांचा आरोप चुकीचा आहे. सध्या ८२ हजार ८०० कोटी रुपयांच्या ठेवी असूनही मुंबईतील विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, असे ते म्हणाले. आरोप करणाऱ्यांना आम्ही कामातून उत्तर देतोय. त्यामुळेच मुंबईच्या तिजोरीत आज सात हजारांची भर पडली आहे.

मुंबईत आज ४३ हजार कोटींची विकासकामे केली जात आहेत. त्यामुळे एफडीबद्दलचे सगळे आरोप खोटे आहेत, ते वस्तुस्थितीला धरून नाहीत, असे एकनाथ शिंदे म्हणाले. याआधी मुंबईला लुटणारे लोक होते, त्यांना आम्ही आरसा दाखवला आहे. जे मुंबईला सोन्याची अंडी देणारी कोंबडी समजत होते, त्यांना आता अडीच वर्षात कसा विकास होऊ शकतो हे आम्ही दाखवले, अशी टीकाही शिंदे यांनी ठाकरे गटावर केली.

# शिर्डीतील साई संस्थानचा मोठा निर्णय:कर्मचाऱ्यांच्या कामाची वेळ बदलली; दुहेरी हत्याकांडानंतर वेळात बदल

**अहिल्यानगर (वृत्तसंस्था)**–शिर्डीतील साई संस्थानच्या कर्मचाऱ्यांची हत्या झाल्यानंतर आता संस्थानच्या वतीने काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या कामाची वेळ बदलण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना सकाळी चार ऐवजी आता सकाळी सहा वाजता कामावर यावे लागणार आहे. त्याचबरोबर या हत्याकांडात मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना विमा पॉलिसीच्या सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी साई संस्थानच्या वतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने घेण्यात आलेल्या वेळापत्रक बाबतच्या या निर्णयाची अंमलबजावणी ही आजपासूनच होणार आहे.

शिर्डीच्या साई संस्थानच्या २ कर्मचाऱ्यांची चाकूने भोसकून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. सोमवारी पहाटे दोन वेगवेगळ्या ठिकाणी या घटना घडल्या. या घटनेत अन्य एक तरुण गंभीर जखमी झाला आहे. या हत्याकांडामुळे शिर्डी चांगलीच हादरली होती. या संदर्भात साई संस्थानच्या वतीने घेण्यात आलेला हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.सुभाष साहेबराव घोडे व नितीन कृष्णा शेजुळ अशी मृत कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तर कृष्णा देहरकर असे गंभीर जखमी तरुणाचे नाव आहे. कृष्णावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत कर्मचारी व जखमी तरुण सोमवारी पहाटे साई संस्थानच्या आपल्या नोकरीवर येत होते. पण रस्त्यातच त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी



प्राणघातक हल्ला केला. त्यात सुभाष व नितीन हे दोघेही जागीच ठार झाले. या दोघांवर तासाभराच्या अंतराने हल्ला करण्यात आला.हा हल्ला कशामुळे झाला? हे स्पष्ट झाले नाही. पण या घटनेमुळे अवघी शिर्डी हादरली आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पोलिसांना त्याची माहिती कळवली. पण पोलिसांनी तासभर विलंबाने घटनास्थळ गाठल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. इथे कुणीही कुणासाठी लगबगीने येत नाही, असा आरोप मृत तरुणाच्या कुटुंबीयांनी केला. या हत्येला अपघाताचे स्वरुप देण्यात येत असल्याचा आरोपही या प्रकरणी केला जात आहे. मृत सुभाष घोडे हे शिर्डीच्या करडोबा नगर चौकात राहत होते. त्यांच्यावर घरापासून काही अंतरावरच हल्ला करण्यात आला. तर नितीन शेजुळ व कृष्णा देहरकर यांच्यावर श्रीकृष्ण नगर भागात हल्ला झाला.मोफत अन्नछत्रामुळे शिर्डीत गुन्हेगारी वाढत आहे. सोमवारी पहाटेची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. खरे तर अशी घटना आधी कधी घडलेली नाही. मोफत अन्नछत्र, मोफत शिर्डी करून ठेवलीय. त्यामुळे गुन्हेगारी वाढली आहे. आम्ही जे बोललो होतो ते कोणत्या उद्देशाने बोललो होतो ते महाराष्ट्राला कळेल. हे प्लॅन मर्डर वाटत नाहीत. नशेतील रँडम मर्डर आहेत, असे सुजय विखे पाटील यांनी म्हटले आहे.

# शेती,आरोग्याच्या प्रश्नावर खा.लंके आक्रमक;संसदेत उठविला आवाज

**नवी दिल्ली । सुयश नरसाळे**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पानंतर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना खासदार नीलेश लंके यांनी शेती व आरोग्याच्या प्रश्नावर अर्थसंकल्पात तरतुद नसल्याविषयी लोकसभेत आवाज उठविला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना खासदार नीलेश लंके यांनी आक्रमक भूमिका मांडत अर्थसंकल्पात सर्वसामान्य नागरीकांसाठी तरतुद केली नसल्याबद्दल खंत व्यक्त केली.

संसदेत बोलताना खा. लंके म्हणाले, धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्वाचे असते. केंद्र सरकारच्या आरोग्य धोरणात अनेक घोषणा करण्यात आल्या असल्या तरी त्यात काही गंभीर समस्या दुर्लक्षित करण्यात आल्या आहेत. आरोग्यासाठी सरकारने वाढीव निधीची घोषणा केली असली तरी ती अत्यल्प आहे. भारतासारख्या मोठया देशात सार्वजनीक आरोग्य सेवांमध्ये अधिक गुंतवणूक होणे आवश्यक असतानाही ही गुंतवणूक अपेक्षेपेक्षा कमी आहे. ग्रामीण भागात प्राथमिक अरोग्य केंद्र, शहरी भागात जिल्हा रूग्णालय, सरकारी रूग्णालय सेवा अद्याप अपेक्षीत हव्या तेवढया नाहीत. अनेकदा रूग्ण रूग्णालयात गेल्यानंतर डॉक्टर तिथे उपस्थित नसतात. त्यासाठी जास्तीत जास्त डॉक्टर रूग्णालयांमध्ये उपस्थित असणे आवष्यक आहेत. वैद्यकिय सुविधा शासकीय रूग्णालयांमध्ये उपलब्ध नसल्याचे खा. लंके यांनी सभागृहाच्या निर्दशनास आणून दिले. अर्थसंकल्पात आयुष्यमान भारत योजना पुढे रेटली जात असली तरी ही योजना खाजगी रूग्णालयांच्या फायद्याच्या ठरत आहेत. त्यातून सार्वजनीक आरोग्य सेवा दुर्बल होत आहे. सामान्य नागरीकांपेक्षा खाजगी वैद्यकिय रूग्णालयांना त्याचा फायदा होत असल्याचा आरोप खा. लंके यांनी केला. औषधे आणि संशोधन केंद्राकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे असून त्यासाठी जास्तीत जास्त निधी देणे अपेक्षित असल्याचे सांगतानाच सन २०१९-२० च्या कालखंडामध्ये कोविडची महामारी आली. अनेकांना त्यात जीव गमवावा लागल्याचे खा. लंके यांनी सभागृहाच्या निर्दशनास आणून दिले. हा अनुभव गाठीशी धरून सरकारने आरोग्य सेवेसाठी जास्त निधी मंजुर करणे आवष्यक आहे. प्रत्येक रूग्णालयात अतिदक्षता विभागाची सुविधा निर्माण करून देणे गरजेचे असल्याचे लंके यांनी सांगितले. आजकाल कॅन्सरसारख्या आजाराला लहान मुलांना सामोरे जावे



लागत आहे. पाच दिवस, नऊ दिवसाच्या बालकाला लिव्हर ट्रान्स्फरसारख्या आजाराला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे यापुढील कालखंडामध्ये आरोग्यासाठी अधिक निधीची तरतुद करणे अपेक्षित असल्याचे खा. लंके म्हणाले. परदेशात गेल्यानंतर खाजगी रूग्णालयांपेक्षा शासकीय रूग्णालयांमध्ये अधिक सुविधा मिळत असल्याचे दिसून येते. मात्र आपला देश आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये अतिशय कमजोर आहे. उपचाराअभावी अनेक रूग्णांना त्यांचे जीव गमवावे लागतात असेही खा. लंके म्हणाले. शासनाच्या अनेक योजना आहेत. त्यातून देण्यात येणा-या अनुदानातून रूग्णाच्या अजाराचा खर्चही भागत नाही. कॅन्सरसारख्या आजारासाठी ४० ते ५० लाख रूपयांचा खर्च येतो. लिव्हर ट्रान्सप्लांटसाठी २० ते ३० लाख खर्च सांगितला जातो. किडनीच्या आजारासाठीही मोठा खर्च येतो त्यामुळे गरीब जनतेसाठी आरोग्यासाठी बजेट वाढविणे आवष्यक आहे. शेतकरी हिताकडे या बजेटमध्ये काहीही करण्यात आलेले नाही. शेतमालास आधारभुत किंमत मिळावी, खते, डिझेल तसेच बियाण्यांवरील अनुदानात कपात झाल्याने उत्पादन खर्च वाढला आहे. त्यासाठी शेतकरी कर्जमाफी आणि सुधारित पीक विमा योजनेची शेतकरी बांधवांची अपेक्षा होती. मात्र बजेटमध्ये त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. सरकार मोठया उद्योजकांना शेती क्षेत्रात आणत असल्याने लहान शेतक-यांचे नुकसान होण्याची भिती आहे. त्यासाठी शेतकरी वर्गासाठी बजेटमध्ये मोठया प्रमाणावर तरतुद होणे अपेक्षित आहे. दुध दरवाढीसंदर्भात केंद्र सरकारने अनेक योजना राबविणे अपेक्षित आहे. दुधाच्या उत्पादन खर्चावर हमीभाव देणे अपेक्षीत आहे. दुधाच्या उत्पादनासाठी ३५ ते ४० रूपये प्रतिलिटर खर्च येतो. उत्पादन खर्चावर दुधाचा दर ठरला पाहिजे अशी अग्रही मागणी खा. लंके यांनी केली. दुधामध्ये मोठया प्रमाणावर भेसळ होते. त्यावर कठोर कारवाई अपेक्षीत आहे. भेसळीमुळे लहान मुलांना कॅन्सरच्या आजाराला सामोरे जावे लागत असल्याकडेही खासदार नीलेश लंके यांनी लक्ष वेधले. खासदार नीलेश लंके यांनी संसदेमध्ये शेती तसेच आरोग्याच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले.

## शेतकरीविरोधी अर्थसंकल्पाविरोधात अखिल भारतीय किसान सभेचे आंदोलन; ५ फेब्रुवारीला देशभर निदर्शने

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने नुकताच संसदेत सादर केलेला २०२५ चा केंद्रीय अर्थसंकल्प शेतकरीविरोधी आणि जनविरोधी असल्याचा आरोप अखिल भारतीय किसान सभेने AIKS केला आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, हमीभावाच्या कायदेशीर हमी, कृषी विकासासाठी आवश्यक निधी आणि ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी कोणतीही ठोस तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात ५ फेब्रुवारी २०२५ रोजी देशभरातील शेतकरी आणि कष्टकरी जनता अर्थसंकल्पाच्या प्रती जाळून निषेध करणार आहे.

भाजपाच्या नरेंद्र मोदी सरकारने पुन्हा एकदा कॉर्पोरेट कंपन्यांसाठी मोठ्या प्रमाणावर कर्जमाफी आणि करसवलती जाहीर केल्या, मात्र शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे साफ दुर्लक्ष केले आहे. AIKSच्या मते, २०२५ च्या अर्थसंकल्पात २४.०३ लाख कोटी रुपयांची कर्जमाफी कॉर्पोरेट क्षेत्राला देण्यात आली आहे, तर शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा कोणताही उल्लेख नाही. कृषी क्षेत्रासाठीची तरतूद ५,००० कोटी रुपयांनी घटवून केवळ १.७१ लाख कोटी रुपये केली आहे. ही रक्कम संपूर्ण अर्थसंकल्पाच्या केवळ ३% आहे, तर देशातील ६०% लोकसंख्या अजूनही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून केवळ मोठ्या कंपन्यांना लाभ मिळवून देण्याचे धोरण सरकारने अवलंबले आहे, असे AIKSचे अध्यक्ष कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी सांगितले.शेतकऱ्यांसाठी असलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN) योजनेत १०,००० रुपये अनुदान दिले जाईल अशी अपेक्षा होती, मात्र हे अनुदान केवळ ६,००० रुपये ठेवण्यात आले आहे



तसेच, प्रधानमंत्री पीकविमा योजनेसाठी (PMFBY) ३,६२२ कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे, तर खतांसाठीच्या अनुदानात २,११३ कोटी रुपयांची घट झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होऊन त्यांना मोठे आर्थिक संकट येण्याची शक्यता आहे.शेतकरी आणि ग्रामीण भागातील तरुणांसाठी रोजगाराच्या कोणत्याही नव्या संधी या अर्थसंकल्पात निर्माण करण्यात आलेल्या नाहीत. याउलट, शिक्षण कर्जाच्या थकीत रकमेचे प्रमाण (NPA) १.२ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. यामुळे शेती आणि शिक्षण क्षेत्र दोन्ही संकटात सापडले असून बेरोजगारीच्या समस्येत मोठी वाढ झाली आहे.

AIKS च्या माहितीनुसार, २०२५ पर्यंतच्या मोदी सरकारच्या कार्यकाळात ४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. ही आकडेवारी रोजच्या सरासरी ३१ शेतकरी आत्महत्या दर्शवते. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या आश्वासनाची पूर्तता न करता, सरकारने शेतकऱ्यांवर अधिक आर्थिक ओझे टाकले आहे.शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनतेसाठी सरकारने स्वतंत्र 'किसान अर्थसंकल्प' सादर करावा, अशी प्रमुख मागणी अखिल भारतीय किसान सभेने केली आहे. या मागण्या पुढे ठेवत - खघड ने खालील ठोस मागण्या केल्या आहेत :च०डझ ची कायदेशीर हमी देण्यात यावी आणि संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी.खते, बियाणे आणि इतर उत्पादन खर्चासाठी अनुदान वाढवावे.लहान शेतकऱ्यांचे हित सांभाळत पारंपरिक मत्स्यव्यवसाय आणि ग्रामीण उद्योगांचे संरक्षण करावे.बेरोजगारी आणि कृषी संकटावर तातडीने उपाययोजना जाहीर कराव्यात.कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र 'किसान अर्थसंकल्प' सादर करावा.शेतकरी विरोधी धोरणांविरोधात ५ फेब्रुवारी २०२५ रोजी देशभरातील शेतकरी आणि नागरिक रस्त्यावर उतरून अर्थसंकल्पाच्या प्रती जाळणार आहेत. -खघड आणि संयुक्त किसान मोर्चाच्या (SKM²) नेतृत्वाखाली शेतकरी मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडणार आहेत.AIKS चे अध्यक्ष कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर संघर्ष अधिक तीव्र केला जाईल. कृषी क्षेत्राच्या उद्ध्वस्त स्थितीसाठी केंद्र सरकार जबाबदार आहे आणि आता याविरोधात लढा देण्याची वेळ आली आहे.५ फेब्रुवारीला होणाऱ्या देशव्यापी आंदोलनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## अत्यंत वर्दळीचा शिळफाटा रस्ता आज पासून पासून पाच दिवस बंद रहाणार



**ठाणे । प्रतिनिधी**

शीळफाटा रस्त्यावरील पलावा जंक्शन जवळील निळजे रेल्वे उड्डाणपुलाच्या कामासाठी ५ फेब्रुवारीपासून रात्री १२ ते १० फेब्रुवारी रात्री १२ पर्यंत वाहतूक बंद असणार आहे. ५ ते १० फेब्रुवारी या पाच दिवसांच्या कालावधीत पलावा जंक्शनकडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती कोळसेवाडी वाहतूक पोलिस विभागाने पोलीस दिली आहे .रेल्वे उड्डाणपुलाच्या कामामुळे शिळफाटा ते कल्याण रस्ता बंद राहणार आहे. त्यामुळे मुंबई, नवी मुंबईहून डोंबिवलीला जाणाऱ्या आणि शिळफाटा मार्गे मुंबईला जाणाऱ्या वाहनांचा मार्ग बदलण्यात आला आहे. ५ फेब्रुवारी रात्री १२ ते १० फेब्रुवारी रात्री १२ पर्यंतच्या कालावधीत पलावा जंक्शनकडे येणारी हलकी, मध्यम वाहनांची वाहतूक पर्यायी रस्ते मार्गाने वळवण्यात येणार आहे. अवजड वाहनांना हा रस्ता बंद असणार आहे.

या कालावधीत शिळफाट्यासह पर्यायी रस्ते मार्गांवर वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी १५० हून अधिक वाहतूक पोलीस, वाहतूक सेवक विविध रस्त्यांवर चक्राकार पध्दतीने २४ तास तैनात असणार आहेत वाहतूक विभागाचे वरिष्ठ, मेट्रो, डीएफसीसी विभागाचे अधिकारी यांची एक बैठक लोढा पलावा येथील एका शाळेच्या सभागृहात सोमवारी घेण्यात आली. या बैठकीत शिळफाटा रस्ता बंदचा प्रवाशांना त्रास होऊ नये, पर्यायी रस्ते मार्गावरील वाहतूक नियोजन विषयावर चर्चा करण्यात आली. कल्याण, मुंब्रा वाहतूक विभागाचे साहाय्यक पोलीस आयुक्त, मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस,कोळसेवाडी, डोंबिवली वाहतूक विभागाचे सर्व कर्मचारी, अधिकारी पाच दिवस शिळफाटा वाहतूक बंदीचा कोणाही प्रवाशाला वाहतूक कोंडीच्या माध्यमातून त्रास होऊ नये म्हणून स्वता तैनात असणार आहेत.

## मंदिर परिसरांच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**लोणी । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पुरातन मंदिरांच्या विकासाला प्राधान्य देत त्यांचे जतन करण्यासाठी आवश्यक निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. हिंदू धर्म आणि संस्कृतीचे प्रतीक असलेल्या या मंदिरांचा वारसा जोपासणे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.



राहाता शहराचे आराध्यदैवत असलेल्या श्री वीरभद्र महाराज मंदिराला 'क' वर्ग देवस्थानाचा दर्जा मिळाल्याबद्दल पालकमंत्री विखे पाटील यांचा विश्वस्त मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी वीरभद्र महादेव मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की, जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. विकासाच्या प्रक्रियेसोबत पारंपरिक मंदिरांचा वारसाही जपला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या कार्यक्रमाला माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, मुकुंदराव सदाफळ, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष साहेबराव निधाणे, ॲड. रघुनाथ बोठे, उपाध्यक्ष सचिन बोठे, माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ आदी मान्यवर उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गावर विरुळ गावाजवळ भीषण अपघात

# ट्रक आणि ट्रॅव्हल्सची समोरासमोर धडक,दोन गंभीर,पाच जखमी

**वर्धा । प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर विरुळ गावाजवळ आज पहाटे ट्रक आणि प्रवासी बसच्या भीषण अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले असून, पाच जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला.

आज पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास ट्रक (क्र. उऋ ०७उझ ४५५९) मुंबई कॅरिडॉरकडे जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रक बॅरिकेडिंग तोडून समोरून येणाऱ्या प्रवासी बसवर (क्र. चझ ४४नए ७८८४) जाऊन आदळला. या भीषण धडकेत ट्रकचा क्लीनर रणजित विश्वकर्मा (रा. छतरपूर, झारखंड) आणि ट्रॅव्हल्स बसचा चालक रफिक खान (वय ३५) गंभीर जखमी झाले आहेत, तर ट्रक चालक लव शर्मा (वय २८) आणि बस क्लीनर निसार खान (वय २५, रा. जोधपूर, राजस्थान) किरकोळ जखमी झाले आहेत. अपघातानंतर घटनास्थळी तातडीने धामणगाव, वर्धा आणि विरुळ येथून ॲंबुलन्स आणि डॉक्टरांची टीम दाखल झाली. जखमींना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी सावंगी येथे हलविण्यात आले.




अपघातग्रस्त बसमधील प्रवासी हे वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास करीत होते. यात मनोहर भंडारे (६२), धनलक्ष्मी भंडारे (५६), श्रद्धा भंडारे (२७), विद्या केंडले (५७), श्रीनिवास केंडले (६८), दर्शन पंडित (२२), महादेव अंबोले (४६), वेणू गोलीपिल्ली (४०), स्वप्नील जगताप (२४), राहुल गौर (२४) आणि इतर प्रवासी होते. त्यांना पुढील प्रवासासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली.

अपघाताची माहिती मिळताच पुलगाव पोलीस ठाण्याचे पीएसआय सदानंद वढतकर, मोहम्मद गौरव व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच समृद्धी महामार्ग पेट्रोलिंग पथकातील पीएसआय प्रमोद धोटे, भारत पिसुड्डे, सुनील भगत, अजय बेले, निखिल वाडकर यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी ॲफकोन कंपनीच्या सुरक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील मदत केली. या अपघातासंदर्भात पुलगाव पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक उन्नती करा-उपसभापती वाघ

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिला बचत गटांच्या उत्पादनांची पाहणी व समस्या जाणून घेण्यासाठी पंचायत समितीचे उपसभापती प्रदीप वाघ यांनी दोन दिवसीय भेट दौरा आयोजित केला असून त्याची सुरुवात आज पाचघर येथुन केली.यावेळी बोलताना प्रदीप वाघ यांनी सांगितले की बचतगटांनी उत्पादित होणाऱ्या मालाची विक्री करण्यासाठी सरस कार्यक्रम,उमेद मार्ट, तसेच स्थानिक बाजारपेठेत न घाबरता झेप घ्यावी,महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम झाल्या शिवाय सामाजिक प्रगती होणार नाही असे हि वाघ यांनी सांगितले.

यावेळी बचतगटाच्या उत्पादित केलेल्या वस्तूंची, खाद्य पदार्थांची तसचे व्यवसायिक स्टॉल ला देखील भेट दिली. आज पाचघर, कडुचीवाडी, किनिस्ते, हट्टीपाडा, जोगलवाडी, खोडाळा येथील गटांना भेट



दिली. यावेळी पंचायत समिती सदस्य सौ आशा झुगरे,उमेद चे सचिन मुंढे, अमोल मोंहडकर, अश्विन कोरडा,मयुरी गवारी या सह सरपंच नरेंद्र येले, सरपंच लता वारे,मंगेश दाते, परशुराम अगिवले, नंदकुमार वाघ, सखाराम शिद, ग्रामपंचायत सदस्य कविता मडके,कल्पना कडु, बाळकृष्ण शिंदे,भारती शिंदे,हिरा शिंदे बचतगटांच्या अध्यक्ष, सचिव सदस्या व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## आर.के.ज्ञान मंदिरम येथे वसंत पंचमी उत्साहात साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

वसंत पंचमी हा सकारात्मकता, आनंद आणि शिकण्याची भावना पसरवणारा, व्यक्ती आणि कुटुंबांना आनंद, यश आणि वाढ देणारा सण आहे. वसंत पंचमी म्हणजे वसंत ऋतूचे आगमन, नवीन सुरुवात, निसर्गाचे सौंदर्य आणि नवीन संधींसह येणारा आनंद साजरा करण्याचा काळ होय.

आर.के. ज्ञान मंदिरम, नाचनगाव, पुलगाव येथे शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास, पर्यवेक्षिका श्रीमती प्रीती बिडकर, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत वसंत पंचमी मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विशेष परिपाठाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानाची देवी - देवी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून झाली. हा कार्यक्रम देवी सरस्वतीचा सन्मान करण्यासाठी आणि आपल्या जीवनात ज्ञान मिळविण्यासाठी तिचा आशीर्वाद घेण्यासाठी साजरा करण्यात आला. शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना वसंत पंचमीचे महत्त्व स्पष्ट केले आणि सर्वांना वसंत पंचमीच्या शुभेच्छा दिल्या.

# हिरडा वृक्ष संवर्धनासाठी किसान सभेचे वन अधिकाऱ्यांना निवेदन

**अकोले । अण्णासाहेब चौधरी**

समृद्ध जंगल, समृद्ध जीवन अभियाना अंतर्गत, अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने वन अधिकाऱ्यांना निवेदन देऊन हिरडा रोपे तयार करून येत्या पावसाळ्यात हिरडा लागवडीचे नियोजन करण्याची मागणी करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत राजूर मध्ये वन परिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) विभाग आणि वन परिक्षेत्र अधिकारी(भ.व.का) यांना हिरडा रोपे तयार करुन लागवडीचे नियोजन करावे या बाबत निवेदन देण्यात आले. अकोले, आंबेगाव व जुन्नर तालुक्यामध्ये सर्वच वन अधिकाऱ्यांना या अंतर्गत निवेदन सादर करण्यात येत आहेत.

मागिल वर्षी ९ ऑगस्ट २०२४ च्या जागतीक आदिवासी दिन व क्रांती दिनाचे औचित्य साधून आदिवासी भागात हिरडा रोपे लागवड आणि संगोपन करून पर्यावरणाचा समतोल राखत, भविष्यात कायम स्वरूपी रोजगार निर्मितीचे काम करण्याचा संकल्प अखिल भारतीय किसान सभेने केलेला होता. या अंतर्गत या वर्षीही हा उपक्रम राबविला जावा व या प्रक्रियेत वन विभाग व जनतेला सामावून घ्यावे यासाठी किसान सभेने व्यापक प्रयत्न सुरू केले आहेत.




वन्य प्राण्यांनी हिरडा बिया खाल्ल्यानंतर त्यांच्या पचनसंस्थेमध्ये हिरडा बियांवर प्रक्रिया होते. अशी प्रक्रिया झालेल्या बिया जंगलामध्ये रुजतात. हिरडा फळे खाणाऱ्या वन्य प्राण्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत गेल्याने व पाळीव प्राण्यांना वनांमध्ये चराईबंदी केल्यामुळे हिरडा बिया जनावरांच्या पोटात जाऊन त्यांच्यावर नैसर्गिक प्रक्रिया होण्याची क्रिया बंद झाली आहे. परिणामी जनावरांच्या पोटात नैसर्गिक बीज प्रक्रिये अभावी गेले अनेक वर्षापासून नवीन हिरडा झाडे नैसर्गिकरित्या उगणे जंगलामध्ये जवळजवळ बंद झाले आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन असलेल्या व पर्यावरण रक्षणामध्ये प्रमुख भूमिका निभवणाऱ्या हिरडा या वृक्षाची प्रजात यामुळे नष्ट होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागली आहे. किसान सभेने ही आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेऊन हिरडा वृक्ष संगोपणावर मूलभूत काम करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन प्रशासन व वन विभागाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याच्या दृष्टिकोनातून सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना याबाबत निवेदन देण्याची मोहीम किसान सभेच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. राजुर वन विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये जागृती करून नियोजन करण्यात आले होते. सदर निवेदन देण्यासाठी राजुर विभागातील किसान सभेचे कार्यकर्ते कॉ.नामदेव भांगरे, कॉ.वसंत वाघ, कॉ.अर्जुन गंभीरे, कॉ.लक्ष्मण घोडे, कॉ.दुंदा मुठे, कॉ.सुनिल बांडे, कॉ.दत्ता कोंडार, कॉ.भाऊराव हिले, कॉ.साहेबराव भांडकोळी, कॉ.राघू जिजाराम भांगरे उपस्थित होते.

एकीकडे हिरडा रोपे तयार करण्यासाठी वन विभागाला निवेदनाद्वारे किसान सभेच्या वतीने साकडे घातले जात असतानाच दुसऱ्या बाजूला किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांनाही हिरडा बियांवर प्रक्रिया करून रोपे तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशासन व जनतेच्या संयुक्त प्रयत्नातून आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे साधन असलेले व पर्यावरण रक्षणामध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारे हिरडा वृक्ष संगोपन मोहीम अधिक व्यापक केली जात आहे.

# जिल्हास्तरीय ललित कला स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**अहिल्यानगर । शहाजी दिघे**

अहिल्यानगर : लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था व प्रवरा कला अध्यापक संघ आयोजित पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय ललित कला स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ माननीय नामदार शालिनीताई विखे पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अहिल्यानगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.




या समारंभात प्रवरा माध्यमिक विद्यालय, झरेकाठी तालुका संगमनेर येथील कुमारी वाकचौरे अनुष्का गहिनीनाथ या विद्यार्थिनी चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवुन तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले याप्रसंगी संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ.लिलावती सरोदे मॅडम, प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल प्राचार्य रत्नपारखी मॅडम, प्रवरा कला अध्यापक संघाचे अध्यक्ष जरे सर, विद्यालयाचे कलाशिक्षक श्री.मनोज पवार सर उपस्थित होते. तालुकास्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. प्रभाकर सांगळे सर तसेच स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष पोपटराव वाणी पाटील, शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष गोरख वाणी,पा. व सदस्य सर्व शिक्षक शिक्षिका पालक ग्रामस्थांनी अभिनंदन केले

# पी.एम.सूर्यघर योजनेत भंडारा जिल्ह्यात १७९३ सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

**भंडारा । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या माध्यमातून भंडारा जिल्ह्यात १७९३ सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून ६७९७ किलोवॅट वीज निर्मिती सुरू आहे. नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांनी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत केले. या बैठकीत समिती सदस्यांसह सरपंच बेला व वलमाझरी हे उपस्थित होते. जिल्ह्यातील जांभळपाणी, येनोळा व वलमाझरी ही गावे सौर ग्राम म्हणून घोषित करण्यात आली असून बेला हे मॉडेल सोलर विलेज म्हणून निवडण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी या गावांमध्ये १००% घरगुती ग्राहकांनी सोलर रूफटॉप लावावे, असे आवाहन केले.



महावितरणच्या भंडारा व साकोली विभागांतर्गत १७९३ नागरिकांनी सौर ऊर्जा संयंत्र बसवले असून यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा निर्मिती होत आहे. महावितरणवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तसेच अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचे महत्त्व पटवून देण्यासाठी ही योजना प्रभावी ठरत आहे. राज्यातील ग्राहकांना रूफटॉप सोलर सिस्टीम बसवण्यासाठी महावितरण मार्गदर्शन करत आहे.

या योजनेत सहभागी होणाऱ्या नागरिकांना अनुदानाचा लाभ दिला जात असून १ कि.वॅ. सोलर सिस्टीमसाठी ३०,००० रुपये, २ कि.वॅ. साठी ६०,००० रुपये आणि ३ कि.वॅ. किंवा अधिकसाठी ७८,००० रुपये अनुदान दिले जात आहे. १ कि.वॅ. सोलर सिस्टीममधून दररोज ४ युनिट, म्हणजेच दरमहा १२० युनिट वीज तयार होते. महिन्याला १५० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या कुटुंबांसाठी १ ते २ कि.वॅ. सिस्टीम पुरेशी ठरत असून १५० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या कुटुंबांसाठी २ ते ३ कि.वॅ. सिस्टीम योग्य ठरत आहे. भंडारा जिल्ह्यात प्रधानमंत्री सूर्यघर योजनेस उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांनी केले.

# ब्रम्हपूरीत सांस्कृतिक व क्रिडा महोत्सवाचे आयोजन करणार–आमदार विजय वडेट्टीवार

## जुगनाळा येथे तालुकास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा

**ब्रम्हपूरी । प्रतिनिधी**

शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांमधील सांस्कृतिक व क्रिडा विषयक गुणांना भरारी मिळावी व त्यांचे कौशल्य विकसित व्हावे म्हणून क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केल्या जातात. ही बाब निश्चितच चांगली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आपण पाऊले उचलली असुन शाळांना आता संगणक उपलब्ध करून देणार आहोत. तर ब्रम्हपूरी क्षेत्रातील विद्यार्थी प्रशासकीय अधिकारी घडावेत म्हणून ब्रम्हपूरी शहरात मोठी ईलायब्ररी बनवली असून ग्रामीण भागात देखील अनेक गावांत अभ्यासिका बनवण्यासाठी मी प्रयत्नरत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून ब्रम्हपूरीमध्ये देखील भव्यदिव्य क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्याचा माझा मानस आहे असे




प्रतिपादन महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते तथा ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.

ब्रम्हपूरी तालुक्यातील जुगनाळा येथे ब्रम्हपूरी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने तालुकास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सरपंच लक्ष्मी सहारे ह्या होत्या.तर प्रमुख अतिथी म्हणून तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, गटविकास अधिकारी रवींद्र घुबडे, गटशिक्षणाधिकारी मयुर लाड, उपसरपंच गोपाल ठाकरे, शा.व्य.स.अध्यक्ष गोपाल तोंडरे, शिक्षण विस्तार अधिकारी गायत्री तोराम, शिक्षण विस्तार अधिकारी विद्या शेळके, शिक्षण विस्तार अधिकारी माणिक खुणे, ग्रामसेवक अश्विनी कायरकर, सुधाकर पोपटे, पुष्पाकर बांगरे, शालिकराम मैंद, ग्रा.पं.सदस्य चंद्रशेखर मेश्राम, सुरेश चौधरी यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, ग्रामीण भागात विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. यापुढे आता शैक्षणिक विकासासाठी निधी मंजूर करण्यावर आपला भर असून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान मिळावे म्हणून संगणक उपलब्ध करून देणार आहोत. विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह, विविध क्रिडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी हा सोहळा अविस्मरणीय बनवला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोवर्धन टिकले यांनी केले. आयोजीत कार्यक्रमास मोठया संख्येने नागरीक उपस्थित होते

# बारावी व दहावीच्या परीक्षांसाठी तयारी पूर्ण

## जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक संपन्न




**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात दहावी व बारावीच्या परीक्षांचे सुयोग्य आणि पारदर्शक आयोजन करण्यासाठी जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक संपन्न झाली. परीक्षेसाठी गुप्तचर यंत्रणा सक्रिय करण्यात आली असून, भरारी पथके कार्यरत राहणार आहेत. जिल्ह्यात २२ संवेदनशील परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली असून, त्याठिकाणी विशेष पथक नियुक्त केले जाणार आहे. परीक्षेच्या कामात हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. परीक्षा केंद्रांवर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोबाईलचा वापर करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. बारावी लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ आणि दहावी लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ दरम्यान होणार आहे. विद्यार्थ्यांना गैरप्रकारांपासून दूर ठेवण्यासाठी शासनाने ११२ क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. गैरप्रकार आढळल्यास संबंधित केंद्राची मान्यता रद्द केली जाईल, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

# प्रगतशील शेतकरी मधुकर मुरलीधर शिंदे यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील खिर्डी येथील प्रगतशील शेतकरी मधुकर मुरलीधर शिंदे यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. ९ फेब्रुवारी रोजी त्यांना या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. मधुकर शिंदे यांनी आधुनिक शेती तंत्राचा स्वीकार करून आपल्या शेतात शेडनेट, सिंचन व्यवस्था, शेततळे यासारख्या सुविधांची उभारणी केली आहे. पावसाळ्यात शेततळ्यात संचित पाणी उन्हाळ्यात पीक उत्पादनासाठी वापरण्याची पद्धत त्यांनी अवलंबली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनामुळे ते पंचक्रोशीत 'शिमला मिरची किंग' म्हणून प्रसिद्ध आहेत.



शेतीसोबतच शिंदे ग्रामपंचायतीत रोजगार सेवक म्हणूनही कार्यरत आहेत. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत घरकुल, विहिरी, शेततळे यांसारख्या योजनांची माहिती व लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य ते करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक शेतकरी आधुनिक शेतीकडे वळले असून, रोजगार हमी योजनांचा लाभही अधिकाधिक नागरिकांना मिळू लागला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल ग्रामस्थ व शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# 'ब्राईट' कॉन्वेंट येथे वार्षिक स्नेहसंम्मेलन साजरी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी येथील ब्राईट कॉन्व्हेंट येते मंगळवारी (दि.४) कन्यका सभागृहात वार्षिक स्नेहसंम्मेलन पार पडले.या कार्यक्रमाचे निमित्य साधत शाळकरी मुलांच्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांनी केले.अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष देवराव सरवर,तर प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक राकेश पुन,शिवसेना तालुका प्रमुख सुरज माडूरवार, गटशिक्षणअधिकारी समाधान भसारकर,प्राचार्य अनुराधा सरवर, प्राचार्य




कलावाणिज्य बरडे आदिंची उपस्थिती होती.बौद्धिक विकासासह सांस्कृतिक विकास देखिल गरजेचा आहे.तेव्हा शाळकरी मुलांच्या सर्वांगिण विकासात सांकृतीक कार्यक्रमाची गरज आहे.शिक्षणामुळे माणसाच्या प्रगतीला चालना मिळते व विद्यार्थी उज्वल भारताचे भविष्य असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.यावेळी विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती चीमुकल्यांनी यावेळी उपस्थितांना कलागुणांनी रिझवले.

# सहयोग बचत गटाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**कोरपना । प्रतिनिधी**

सहयोग बचत गटाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी संस्थेचे अध्यक्ष पवन देरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



गडचांदूर येथील बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात सभेचे आयोजन करण्यात आले होते. एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंत या ब्रीदवाक्याने डॉ. पंकजकुमार देरकर यांनी सभेची सुरवात केली. या सभेत सहयोग बचत गट वार्षिक आढावा व पुढील योजनांची सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी डॉ. प्रवीण लोनगाडगे, श्रीनिवास सोनटक्के, प्रशांत रणदिवे, धनंजय बुऱ्हाण, सहयोग बचत गटाचे सचिव नितीन उपगनलावार, सुरेश पाचभाई , अनिल सुर्यतळ, स्वप्नील आत्राम, कुणाल खेडेकर, शेखर बोंद्रे, सचिन देरकर, चंद्रशेखर पाचभाई, कोमल वाटोरे, श्रीकांत खडसिंगे, ऋषिकेश भारती, भारत कुंभारे आणि इतर सदस्य उपस्थित होते.

# सोलापूर शहरातील सलून व्यवसायात २० टक्क्यांनी दरवाढ–प्रभाकर भालेकर

**इंदापूर । प्रतिनिधी**

सोलापूर शहरातील सलून व्यवसायामध्ये एक फेब्रुवारीपासून २० टक्क्यांनी दरवाढ करण्यात आली आहे असे संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर भालेकर पत्रकार परिषद घेऊन यांनी सांगितले आहे.



दरवाढीचे कारण विचारले असता त्यांनी असे सांगितले की महाराष्ट्रातील सर्व ठिकाणी झालेली दरवाढ पाहता सोलापुरातील २० टक्के दरवाढ करण्याचा निर्णय घेतला सदरचे दर हे एक फेब्रुवारी पासून सुरू करण्यात येणार आहे सदरची दरवाढ हि सोलापूर शहरातील सोलापूर महानगरपालिकेने वाढवलेली करवाढ तसेच लाईट बिल दुकान जागेचे भाडे, सौंदर्य प्रसाधने याची झालेली वाढ, तसेच सध्याची महागाई ही खूप मोठ्या प्रमाणात झालेली आहे म्हणूनच नाभिक समाजातील घटनेने हा विचार केला आहे. जुन्या दरा प्रमाणे जर सलून ची सेवा दिली तर नाभिक समाजातील कुटुंबाची खूप मोठी फरफराट होते. म्हणूनच वरील संपूर्ण बाबीची दखल घेऊन च हा निर्णय घेतला आहे व जनतेस ही सहकार्य करण्यासाठी आव्हान केले आहे असे सांगण्यात आले आहे. यावेळी नाभिक समाजातील पदाधिकारी व व्यावसायिक खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेंट जॉनमध्ये फेअरवेल पार्टी उत्साहात साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे दि. ०१/०२ २०२५ रोजी इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ तसेच इयत्ता अकरावी च्या विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले कॉलेजमधील फेअरवेल पार्टी हा जीवनातील एका नव्या क्षेत्रात पाऊल ठेवताना त्यांना निरोप देण्यासाठी साजरा केला जातो.

निरोपाचा क्षण व शाळेने आजवर दिलेली शिकवण, केलेले संस्कार व जगाला निधळ्या छातीने समोर जाण्याची सकारात्मक इच्छाशक्ती ही सर्व शिदोरी घेऊन हळव्या अंतकरणाने व जड पाऊलांनी शाळेची वेस ओलांडण्याचा, जीवनातील अवस्मरणीय क्षण म्हणजे निरोप समारंभ. समारंभाला शाळेचे प्राचार्य श्री संतोषजी यादव, उपप्राचार्य सौ आरती कुरझडकर मॅडम, उपप्राचार्य श्री महेंद्रजी भोयर हे प्रामुख्याने उपस्थित होते.पार्टी म्हटले तर मनोरंजन



हे आलेच, विदयार्थानी नृत्य आणि काहीं मनोरंजक कृती करुन कार्यक्रमाला रंजक बनवले.तसेच आपले शाळेविषयी आणि शिक्षकांविषयी मनोगत व्यक्त केले.शाळेच्या प्रेसिडेंट सौ. प्रीती बोरसे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्याबद्दल भरपूर शुभेच्या दिल्या प्राचार्य श्री संतोषजी यादव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात असे संबोधित केले की कष्ट करा, कष्टाविना पर्याय नाही, तसेच आजकाल ची पिढी ही लहान लहान गोष्टींनी निराश होऊन आपले जीवन संपवितात तर असे न करता जीवनात भरपूर काही गोष्टी असतात ज्याने व्यक्ती यशस्वी होऊ शकतो जसे की इंजिनियर डॉक्टर होऊनच माणूस यशस्वी होऊ शकत नाही तर भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि शेती करूनही माणूस उंच शिखर गाठू शकतो आणिआपले व आपल्या परिवाराचे नाव उज्वल करतो असे प्रतिपादन केले.शाळेचे उपप्राचार्य असो आरती कुरझडकर आणि श्री महेंद्रजी भोयर यांनी सुद्धा मुलांना संबोधित केले.शिक्षकांनीसुद्धा त्यांच्या भविष्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले.शेवटी जड अंतकरणाने व दाटलेल्या कंठाने मूलांनी शाळेचा निरोप घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.सिद्धी शाहागडकर आणि यश्विनी चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भरपूर सहकार्य केले.

# साईधाम मंदिर पुलगाव ते शिर्डी धाम सायकल वारी



**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील मुरली डाबरे मित्र परिवाराने या वर्षी ३१ जानेवारीला पुलगाव ते शिर्डी सायकल वारीला प्रारंभ केला. हे सायकल वारीचे ५ वे वर्ष आहे.

येथील साईधाम साई मंदिरात दि ३१ जानेवारी दुपारी १२ वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर साईमंदिरातून पुलगाव ते शिर्डी साईकल वारी जानारे साईभक्त पुरूष, महिला मंडळीला साईधाम चेरीटबल ट्रस्टचे सदस्यांनी स्वागत करून सायकल वारी प्रस्थान करण्यात आली.पुलगाव ते शिर्डी मधे जागोजागी स्वागत करण्यात येणार आहे. दि. ६ फेब्रुवारीला शिर्डीला साईबाबाचे दर्शन घेऊन वारी पंढरपूरला रवाना होईल.सायकल वारीचे आयोजन मुरली डाबरे मित्र परिवार करत आहे.

# खडसंगी येथे श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी उत्साहात संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

श्री संताजी तेली समाज बहुउद्देशीय मंडळ, खडसंगी यांच्या वतीने श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव, समाज प्रबोधन व मार्गदर्शन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. मानिकादेवी सभागृह, खडसंगी येथे पार पडलेल्या या सोहळ्याला समाजबांधवांची मोठी उपस्थिती लाभली.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक ज्ञानेश्वर चौधरी (अध्यक्ष, श्री संताजी तेली समाज मंडळ, शंकरपूर व उपसरपंच, ग्रामपंचायत शंकरपूर) होते. प्रमुख अतिथी म्हणून धनराजभाऊ मुंगले (अध्यक्ष, विदर्भ तेली समाज महासंघ, चिमूर), डी. के. निकुरे (नायब तहसीलदार, चिमूर), उमेशभाऊ कोराम (अध्यक्ष, स्टुडंट ऑफ फाउंडेशन, नागपूर), डॉ. परसरामजी नागोसे (चिमूर), प्रियंकाताई कोलते (सरपंच, ग्रामपंचायत खडसंगी), राजूजी सातपैसे (शिक्षक, मोहाडी), मोहनजी सातपुते (कवी, चिमूर) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच समाजासाठी जागा दान करणाऱ्या समाजबांधवांचा सन्मान करण्यात आला. पूर्णकृती मूर्ती स्थापन करण्याचा संकल्प अध्यक्षीय भाषणात अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांनी खडसंगी येथे संताजी जगनाडे महाराज यांची पूर्णकृती मूर्ती उभारण्याचा संकल्प जाहीर केला. त्यांनी स्वखर्चातून ५,००१ रुपये देणगी जाहीर करत लोकवर्गणीतून मूर्ती स्थापन करण्याचे आवाहन केले. धनराजभाऊ मुंगले यांनी समाज एकजूट राहून प्रगती करेल, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष सतीशजी देव्हारे, उपाध्यक्ष मदनजी तराळे, सचिव विनोदजी नागोसे, सहसचिव रविंद्रजी कोलते, कोषाध्यक्ष विलासजी तराळे व संपूर्ण समाज बांधवांनी महत्त्वाचे योगदान दिले. संचालन व आभार प्रदर्शन संजय गिरडे सर यांनी केले.या महोत्सवामुळे समाजात एकात्मता वाढून सामाजिक बांधिलकी अधिक दृढ झाली असल्याचे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# आरापूर येथील धनंजय ऑटोमध्ये मोठ्या प्रमाणा वर ध्वनीप्रदूषण; शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

**गंगापूर । प्रतिनिधी**

लासूर स्टेशनजवळील आरापूर येथे गट क्रमांक १० मध्ये सुरू असलेल्या धनंजय ऑटो या कंपनीतून मोठ्या प्रमाणावर ध्वनीप्रदूषण होत असून, यामुळे सुलतानाबाद, आरापूर आणि परिसरातील शेतकरी व नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या प्रदूषणाचा परिणाम जनावरांवर आणि वन्यजीवांवरही होत असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे.



शिवसेनेच्या गंगापूर पंचायत समितीच्या माजी सभापती सविता सुनील केरे यांनी या संदर्भात प्रादेशिक अधिकारी आणि उपप्रबंधक अधिकाऱ्यांना निवेदन देत कंपनीतील ध्वनीप्रदूषणावर तातडीने नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे. अन्यथा शिवसेनेच्यावतीने थेट कंपनीसमोर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.ध्वनीप्रदूषणामुळे शेतकरी आणि त्यांच्या जनावरांचे आरोग्य धोक्यात येत असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी स्थानिकांची मागणी आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या फेब्रुवारी हफ्त्यावर महिलांचे लक्ष–लवकरच मिळण्याची शक्यता

**शिरूर । प्रतिनिधी**

राज्यात मोठ्या चर्चेचा विषय ठरलेली *मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण* योजना जुलै २०२४ पासून सुरू झाली असून, योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा *१५०० रुपये* थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जात आहेत. दरम्यान, फेब्रुवारी महिन्याचा हफ्ता कधी मिळणार, याकडे लाभार्थी महिलांचे लक्ष लागले आहे.

सध्या शासनाकडून यासंदर्भात अधिकृत घोषणा झालेली नसली तरी मागील तीन महिन्यांचा अनुभव पाहता, *शेवटच्या



आठवड्यात हफ्त्याचे पैसे जमा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे **२० फेब्रुवारीनंतर कोणत्याही दिवशी* लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होऊ शकतात. योजनेत अनेक महिलांनी अर्ज केले असून, काही जणी अपात्र ठरल्याने त्यांचे अर्ज माघारी घेतले आहेत. यासोबतच, काही दिवसांपूर्वी अपात्र लाभार्थ्यांकडून आधी मिळालेली रक्कम परत घेतली जाणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यामुळे अनेक महिलांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. फेब्रुवारी महिन्याचा हफ्ता कधी मिळणार यासाठी लाभार्थींनी अधिकृत वेबसाईटवर नियमितपणे तपासणी करावी किंवा बँक खात्यात संदेश (डचड) येत आहे का, हे पाहावे. शासनाच्या अधिकृत घोषणेसाठी ladakibahin. maharashtra. gov.in(https://ladakibahin. maharashtra.gov.in) या संकेतस्थळाला भेट द्यावी.

# पिंपरी दुमाला येथे सार्वजनिक हळदीकुंकू समारंभ–खळदकर दाम्पत्याचा स्तुत्य उपक्रम

**शिरूर । प्रतिनिधी**

मकरसंक्रांतीनंतर सुरू होणारा हळदीकुंकू समारंभ हा महिलांसाठी विशेष पर्वणीचा काळ असतो. याच पार्श्वभूमीवर पिंपरी दुमाला येथे उपसरपंच शरद नानाभाऊ खळदकर व कल्पना शरद खळदकर (माजी अध्यक्षा, शालेय शिक्षण समिती) यांच्या संकल्पनेतून सार्वजनिक हळदीकुंकू सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.



रथसप्तमी (४ फेब्रुवारी) पर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात महिलांना सामाजिक संदेश देत अनोख्या पद्धतीने कार्यक्रम पार पडला. उपस्थित महिलांना वाण म्हणून भेटवस्तू देण्यात आल्या तसेच सर्वांसाठी महाप्रसादाचा देखील आयोजन करण्यात आले.कार्यक्रमास रांजणगाव देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वातीताई दत्तात्रय पाचुंदकर व स्मिता पाचुंदकर उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना हळदीकुंकवाचे महत्त्व पटवून देत मार्गदर्शन केले.कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, विविध सहकारी संस्थांचे संचालक, सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट पदाधिकारी यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.गावातील हा नाविन्यपूर्ण हळदीकुंकू समारंभ चर्चेचा विषय ठरला असून खळदकर दाम्पत्याच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वाढोणा येथे पवन मेडिकल मधून ३० हजारांची चोरी

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील जुना बाजार चौकात असलेल्या पवन मेडिकलमध्ये अज्ञात चोरट्याने शटर उचलून चोरी केली. या घटनेत ३०,००० रुपये रोख रक्कम आणि कॉम्प्युटर मॉनिटर लंपास करण्यात आले.रविवारी (दि. २) सकाळी ९ वाजताच्या सुमारास, मेडिकलचा कर्मचारी दुकान उघडण्यासाठी आला असता, शटर उचकटलेले व सामान विस्कटलेले असल्याचे आढळले. त्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात आले.घटनेची माहिती मिळताच



तळोधी (बा) पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत लांबट व किशोर मानकर पुढील तपास करीत आहेत.

# गाढे पिंपळगावच्या रेखा सामसे यांना 'आदर्श सरपंच' पुरस्कार जाहीर

**गंगापूर । प्रतिनिधी**

गाढे पिंपळगावच्या सरपंच रेखा देविदास सामसे यांना समाजसेवेबद्दल राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. ९ फेब्रुवारी रोजी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रेखा सामसे यांनी विहिरी, शेततळे, गोठे उभारणी, गरजूंना घरकुल योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. तसेच, पंचायत समितीच्या माध्यमातून स्वखर्चाने विविध विकासकामे मंजूर करून आणली. त्यांनी गावातील महिलांसाठी पेन्शन योजना, लाडकी बहिण योजना यांसारख्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली.शाळेच्या उपक्रमांमध्ये त्यांचा



सक्रीय सहभाग असल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणास चालना मिळाली. त्यांच्या कार्याची दखल घेत 'दैनिक सह्याद्रीचा राखणदार' आयोजित महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. त्यांच्या या गौरवाबद्दल पंचक्रोशीतील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# प्राचार्य गणेश इंगळे सेवापूर्ती निमित्ताने सन्मानित

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक रंगलाल केजडीवाल माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश तु. इंगळे यांचा प्रदीर्घ सेवेनंतर 'सेवापुर्ती निमित्त' आर. के. हायस्कूल ट्रस्ट पुलगाव तर्फे शाल,श्रीफळ,भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. सोबतच आर. के. पतसंस्थेच्या वतीने ट्रॉली बॅग अध्यक्ष सुबोध चचाने व सचिव रणजीत धोटे यांच्या हस्ते भेट देण्यात आली. यावेळी प्रामुख्याने संस्थेचे मुख्य समन्वयक नुरसिंग जाधव, उपमुख्याध्यापक आनंद जीवने, उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक गणेश शर्मा मंचावर उपस्थित होते. प्रारंभी शारदा माता व शाळेचे संस्थापक स्व. रंगलालजी केजडीवाल यांच्या प्रतिमेचे पूजन,माल्यार्पण व दीप प्रज्वलन करण्यात आले.

आपली ३६ वर्षांची सेवा पूर्ण करून नुकतेच गणेश इंगळे सेवानिवृत्त झाले. ते आपल्या विषयात निष्णात व प्रामाणिकपणे कार्य करणारे समर्पित विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून अनेक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते सतत प्रयत्नशील असत. विविध शालेय जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी आपल्या शालेय कारकिर्दीत एक नवा आयाम निर्माण केला. शिस्ती सोबतच विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळावे यासाठी त्यांनी सदैव पुढाकार घेतला. प्राचार्य इंगळे विविध खेळात सहभागी होत, सुसंस्कृत पिढी घडवणारे स्काउटर,उत्कृष्ट वक्ता,नागपूर विभागीय 'शिक्षक प्रश्नमंजुषा ' स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेले गुणी शिक्षक, शाळा आपली माता समजून सचोटीने कर्तव्य बजावणारे कर्मठ सेवक, इतरांना सहकार्य करण्यासाठी सदैव तत्पर असणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते अशा भावना




शिक्षकेतर कर्मचारी गजानन बहादूरकर,पुर्वमाध्यमिक विभागाचे सुबोध चचाने, माध्यमिक विभागाच्या माधुरी देशमुख, कनिष्ठ महाविद्यालयाचे निलेश बोबडे यांनी व्यक्त केल्या. वडील आमच्यासाठी मार्गदर्शक, संकटमोचक व सर्वस्व असल्याचे पुत्र चि. तपिश व कन्या पुर्वेशा यानी मनोगत मांडताना सांगितले.शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक, सांस्कृतिक,धार्मिक, पर्यावरण यासारख्या अनेक क्षेत्रात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे अतिथींनी आपल्या भाषणातून त्यांचा गौरव करताना सांगितले. कार्यक्रमाच्या दरम्यान वातावरण अत्यंत भावुक झाले होते. आर. के. हायस्कूल ट्रस्टचे अध्यक्ष सन्माननीय हरिप्रकाशजी केजडीवाल,शाळा समिती अध्यक्ष रंजनकुमारजी केजडीवाल, ज्येष्ठ निमंत्रित सदस्य द्वारकादासजी दरक यांच्यातर्फे प्राचार्य इंगळे यांना आभासी स्वरूपात निरोगी व आनंदी भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. शाळेतील सर्व शिक्षक आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभांगी नवले,आभार प्रदर्शन राजश्री वैरागडे यांनी केले. या भावपूर्ण निरोप समारंभाच्या शेवटी डॉ. स्वाती कावडकर यांनी पसायदान सादर केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# हिरडा वृक्ष संवर्धनासाठी किसान सभेचे वन अधिकाऱ्यांना निवेदन

**अकोले । अण्णासाहेब चौधरी**

समृद्ध जंगल, समृद्ध जीवन अभियानाच्या अंतर्गत अखिल भारतीय किसान सभे ने वन अधिकाऱ्यांना निवेदन देऊन हिरडा रोपे तयार करण्याचे आणि येत्या पावसाळ्यात हिरडा लागवडीचे नियोजन करण्याची मागणी केली आहे. या मोहिमेअंतर्गत, राजूर मध्ये वन परिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) विभाग आणि वन परिक्षेत्र अधिकारी (भ.व.का) यांना निवेदन देण्यात आले. याशिवाय अकोले, आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील सर्व वन अधिकाऱ्यांना या बाबत निवेदन सादर करण्यात येत आहे.

मागील वर्षी ९ ऑगस्ट २०२४ च्या जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिनाचे औचित्य साधून, आदिवासी भागात हिरडा रोपे लागवड व संगोपन करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचे तसेच भविष्यात रोजगार निर्मितीचे काम करण्याचे अखिल भारतीय किसान सभेने संकल्पित केले होते. या उपक्रमाच्या यशासाठी वन विभाग व जनतेला सामावून घेणारे प्रयत्न करण्यात येत आहेत.वन्य प्राण्यांच्या पाचनसंस्थेत हिरडा बिया खाल्ल्यानंतर त्या बियांवर प्रक्रिया होत होती, ज्यामुळे जंगलात हिरडा झाडे उगवीत होती. पण वन्य प्राण्यांची संख्या कमी झाल्यामुळे आणि पाळीव प्राण्यांना जंगलात चराई बंदीमुळे, हिरडा बियांवर नैसर्गिक प्रक्रिया थांबली आहे. परिणामी, नवीन हिरडा झाडे उगवणे जवळजवळ बंद झाले आहे.



हिरडा वृक्ष हा आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आणि पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वाचा घटक आहे. पण, त्याची प्रजात सध्या नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. किसान सभेने हिरडा वृक्ष संगोपनाच्या उपक्रमावर काम करण्याचा निर्णय घेतला आहे आणि शासन व वन विभागाचे लक्ष या मुद्द्याकडे वेधण्याची मोहीम सुरू केली आहे.राजुर वन विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण केली गेली आहे. या अभियानात किसान सभेचे कार्यकर्ते कॉ. नामदेव भांगरे, कॉ. वसंत वाघ, कॉ. अर्जुन गंभीरे, कॉ. लक्ष्मण घोडे, कॉ. दुंदा मुठे, कॉ. सुनिल बांडे, कॉ. दत्ता कोंडार, कॉ. भाऊराव हिले, कॉ. साहेबराव भांडकोळी, आणि कॉ. राघू जिजाराम भांगरे उपस्थित होते.तसेच, शेतकऱ्यांना हिरडा बियांवर प्रक्रिया करून रोपे तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशासन आणि जनतेच्या संयुक्त प्रयत्नातून, आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे साधन असलेले आणि पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वपूर्ण असलेले हिरडा वृक्ष संगोपन अभियान अधिक व्यापक होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## बोरिवली येथे सलून व्यावसायिकावर भ्याड हल्ला; महाराष्ट्रभर संतापाची लाट

**इंदापूर । प्रतिनिधी**

बोरिवली, मुंबई येथे सलून व्यावसायिकाने केलेल्या कामाचे पैसे मागितल्याने त्याच्यावर भ्याड हल्ला करण्यात आला. या घटनेचा संपूर्ण महाराष्ट्रातील नाभिक समाजाने तीव्र निषेध व्यक्त केला आहे.नाभिक समाज प्रामाणिकपणे काम करणारा असूनही काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून असे अन्यायकारक प्रकार घडत आहेत. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती झाल्यास त्यास तीव्र उत्तर दिले जाईल, असा इशारा महाराष्ट्र नाभिक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी दिला आहे.झुंजार यांनी सांगितले की, शतकानुशतके नाभिक समाज महाराष्ट्रातील जनतेची सेवा करत आला आहे. लहान गावांपासून मोठ्या शहरांपर्यंत आम्ही प्रामाणिकपणे व्यवसाय करत आहोत. सौंदर्य वाढवण्याचे आमचे काम आहे आणि आम्ही ते मायाळूपणे पार पाडतो. मात्र, बोरिवली येथील सलून व्यावसायिक रुपेश शिंदे यांच्यावर पैसे मागितल्याने हल्ला होणे, हे निषेधार्ह आहे.संघटनेच्या मागणीमुळे संबंधित आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही या घटनेची माहिती पत्राद्वारे देण्यात आली आहे. भविष्यात अशाच घटना वारंवार घडल्या, तर नाभिक समाज आपल्या सलून सेवा बंद ठेवून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी दिला आहे.

## जिल्हास्तरीय ललित कला स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था व प्रवरा कला अध्यापक संघ यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय ललित कला स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ नामदार शालिनीताई विखे पाटील (माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, अहिल्यानगर) यांच्या शुभहस्ते पार पडला.



या समारंभात प्रवरा माध्यमिक विद्यालय, झरेकाठी, तालुका संगमनेर येथील विद्यार्थिनी कुमारी वाकचौरे अनुष्का गहिनीनाथ यांना चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी संस्थेच्या शिक्षण संचालिका लिलावती सरोदे मॅडम, प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल प्राचार्य रत्नपारखी , प्रवरा कला अध्यापक संघाचे अध्यक्ष जरे , विद्यालयाचे कलाशिक्षक मनोज पवारउपस्थित होते.तालुकास्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रभाकर सांगळे , स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष पोपटराव वाणी पाटील, शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष गोरख वाणी, शिक्षक शिक्षिका, पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन केले.हा समारंभ एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम ठरला आणि विद्यार्थ्यांच्या कलात्मक क्षमता ओळखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## सिंचनासाठी पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांचा गोसेखुर्द प्रकल्प कार्यालयावर संताप

### शेवटच्या टोकापर्यंत पाणी न पोहोचल्याने १०० एकरातील धान पिक धोक्यात; अधिकार्यांकडून पाणी सोडण्याचे आश्वासन

**भंडारा । प्रतिनिधी**

गोसेखुर्द प्रकल्पामुळे नहराद्वारे शेतीसाठी पाणी पुरवले जाते, परंतु अनियोजित कारभारामुळे अनेक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नाही. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागत आहे. याच कारणामुळे संतप्त शेतकऱ्यांनी आंबाडी येथील गोसेखुर्द उपसा सिंचन मंडळाच्या कार्यालयावर धडक दिली.नेरला उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी दिल्या जाणाऱ्या लाखांदूर तालुक्यातील पेंढरी (सो.), तिरखुरी, हरदोली, सोनेगाव या भागातील शेतकऱ्यांनी धान पिकाची लागवड केली आहे. शेतकऱ्यांनी १ जानेवारी रोजी पाणी सोडण्याची मागणी केली होती. संबंधित अधिकाऱ्यांनी नहरात पाणी सोडले, परंतु ते शेवटच्या टोकापर्यंत पोहोचण्याआधीच पाणी बंद करण्यात आले.यामुळे संतप्त झालेल्या ४०-५० शेतकऱ्यांनी थेट आंबाडीचे



कार्यालय गाठून अधिकार्यांना जाब विचारला. चर्चेनंतर अधिकार्यांनी पाणी पुन्हा सोडण्याचे आणि शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले.

यावेळी गोपाल रोहनकर, विलास दहेलकर, केशव रोहनकर, प्रदीप शेंडे, भास्कर रोहनकर, नाशिक मेश्राम, गुलाब मेश्राम, दादा रोहनकर, मछिंद्र शेंडे, पुण्यवान मेश्राम, नरेश भोयर यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, पाणी सोडले जात असले तरी ते शेवटच्या टोकापर्यंत पोहोचत नाही, ज्यामुळे सुमारे १०० एकर क्षेत्रातील धान पिक धोक्यात आले आहे. शेतकऱ्यांनी अधिकार्यांना लवकरात लवकर योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## उन्हाळ्यात पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रभावी नियोजन करा-आ.किशोर जोरगेवार

### मनपात बैठक, टँकर खरेदीसाठी ५० लाखांचा निधी जाहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

उन्हाळा जवळ येत असताना शहरात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या. नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागू नये, यासाठी तातडीने नियोजन करून तात्पुरत्या पाण्याच्या टाक्यांमध्ये वाढ करावी, तसेच शहरातील गळती असलेल्या पाईपलाइन आणि टाक्यांच्या दुरुस्तीची कामे त्वरित पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले आहे.

मनपात झालेल्या बैठकीत पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेताना आ. जोरगेवार यांनी नवीन टँकर खरेदीसाठी ५० लाख रुपयांच्या निधीची घोषणा केली. उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर गरज पडल्यास आणखी निधी मंजूर केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी शहरातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीला मनपा आयुक्त विपिन पालिवाल, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले,




शहर अभियंता विजय बोरिकर यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी आणि माजी नगरसेवक उपस्थित होते.यावेळी आ. जोरगेवार म्हणाले की, प्रशासनाने पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कोणतीही कमी ठेवू नये, उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या टाळण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी एकत्र येऊन जबाबदारीने वागावे, असेही ते म्हणाले. रमाई योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना या सर्व घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. स्वच्छतेबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढत असल्याने पुन्हा एकदा शहर स्वच्छ करण्याची मोहिम हाती घेण्याचे निर्देशही आमदार किशोर जोरगेवार यांनी दिले.

शहरात सांडपाणी वाहिन्यांसाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. त्यामुळे काम पूर्ण होताच खोदलेल्या रस्त्यांची त्वरित डागडुजी करण्यात यावी. कचरा संकलनाच्या बाबतीत नव्याने धोरण तयार करून दररोज कचरा उचलण्याचे नियोजन करण्यात यावे. बाबूपेठ येथे कबड्डी मैदान तयार करण्याची सूचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा अधिकाऱ्यांना दिल्या आहे.शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी महिलांसाठी विशेष स्वच्छतागृह तयार करण्यात यावीत, यासाठी लागणारा निधी आपण उपलब्ध करून देऊ, असेही या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी स्पष्ट केले.

## वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांच्या याचिकेची कोर्टाकडून दखल

### महाराष्ट्र विधानसभेच्या वाढीव मतदानावर निवडणूक आयोगाला कोर्टाची नोटीस;दोन आठवड्यात उत्तर द्या कोर्टाने निवडणूक आयुक्तांना बजावले

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून आजही मोठा संशय व्यक्त केला जात आहे. निवडणुकीत वाढलेल्या मतदानावरून आयोगाकडून अजूनही खुलासा झालेला नाही. अशातच वंचित आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी दाखल केलेल्या याचिकेची दखल हायकोर्टाने घेतली आहे. हायकोर्टाने केंद्रीय निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना नोटीस बजावली असून २ आठवड्यात



खुलासा सादर करावा असे निर्देश कोर्टाने दिले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अखेरच्या टप्प्यात मतदान कसं वाढलं याबद्दल हायकोर्टात याचिका दाखल आहे. आज न्यायमूर्ती अजय गडकरी,न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणूक २०२४ मधे ७६ लाख मतांचा डेटा आमच्याकडे उपलब्ध नाही, असं उत्तर केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलं होतं. एवढंच नाहीतर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत झालेल्या ७६ लाख मताचा डाटा केंद्रीय निवडणूक आयोगाकडे उपलब्ध नाही, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे वाढलेलं ७६ लाख मतांचा हिशेब नाही का? असा सवाल ॲड प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

## शिवराज राक्षेने पंचांना लाथ घातली ही चूक झाली?

### पण सामन्यात जो पंच होता असल्या पंचांना गोळ्या घातल्या पाहिजेत-डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र केसरी स्पर्धेत गादी विभागाच्या अंतिम लढतीत पैलवान शिवराज राक्षे याच्या रौद्रावतारामुळे चांगलाच वाद पेटला आहे.



माझी पाठ टेकलेली नव्हती, किंबहुना दोन्ही खांदे टेकलेले नव्हते, असे सांगत पंचांनी मला बाद ठरविल्याने माझा राग अनावर झाल्याचे शिवराजने सांगितले. शिवराजच्या वर्तनावरून त्याच्यावर टीका होत असताना, त्याच्यावर अन्याय झाल्याचे सांगत त्याची पेहलवान डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी पाठराखण केली आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पंचांशी हुज्जत घातल्याने शिवराज राक्षे आणि महेंद्र गायकवाड यांना चांगलेच भोवले आहे. या दोन्ही पैलवानांना तीन वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने घेतला आहे. या निर्णयाविरोधात दोन्ही पैलवानांनी आक्षेप नोंदवला आहे. मात्र या कारवाईचे समर्थन कुस्तीगीर संघटनेचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी केले आहे. शिवाय डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या वादग्रस्त वक्तव्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

## दिघी येथे तहकुब ग्रामसभा; अपंग लाभार्थ्यांना धनादेश आणि विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**वर्धा । प्रतिनिधी**

देवळी तालुक्यातील दिघी (बोपापूर) येथे सरपंच संदीप दिघीकर यांच्या अध्यक्षतेखाली तहकुब ग्रामसभा आयोजित करण्यात आली. या सभेत गावातील विविध समस्यांवर चर्चा झाली तसेच शासकीय परिपत्रकांचे वाचन करण्यात आले.

ग्रामसभेच्या निमित्ताने अपंग लाभार्थ्यांना धनादेशांचे वाटप करण्यात आले. तसेच अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेशांचे वितरण करण्यात आले. ग्रामपंचायत क्षेत्रात १००% कर वसुली करण्यासाठी ग्रामस्थांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले.यावेळी केंद्रीय राखीव पोलीस दलातून निवृत्त झालेल्या दिघी येथील सैनिकांचा सत्कार करून त्यांचे योगदान गौरवण्यात आले. कार्यक्रमाला स्थानिक ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.



## मीटर रीडिंग संघटनेच्या आंदोलनाला मनसेचा जाहीर पाठिंबा

**वर्धा । प्रतिनिधी**

मागील चार दिवसांपासून आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या मीटर रीडिंग संघटनेला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा (मनसे) जाहीर पाठिंबा मिळाला आहे.

बोरगाव मेघे येथील वीज वितरण कार्यालयासमोरील आंदोलन मंडपाला मनसे वर्धा जिल्हाध्यक्ष शंकर पोटफोडे आणि जिल्हा उपाध्यक्ष नितीन अमृतकर यांनी पदाधिकाऱ्यांसह भेट दिली. त्यांनी



आंदोलनकर्त्यांच्या समस्या व मागण्या जाणून घेतल्या.संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर शंकर पोटफोडे यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबाचे पत्र देत मनसे त्यांच्या मागण्यांसाठी पूर्णपणे पाठिशी असल्याचे स्पष्ट केले.

# मांगली गावाच्या १० कि.मी.परिसरातील क्षेत्र 'अलर्ट झोन' म्हणून घोषित

## बर्ड फ्लू आजाराच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याचे जिल्हाधिका-यांचे निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ब्रम्हपूरी तालुक्यातील मौजा मांगली येथील कुक्कुट पक्ष्यांमध्ये २५ जानेवारी २०२५ पासून मरतुक दिसून आल्यामुळे पशुसंवर्धन विभागामार्फत मृत कुक्कुट पक्ष्यांचे नमुने गोळा करून राज्यस्तरीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे व भोपाळ येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषद - राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग संस्था या प्रयोगशाळेत सादर करण्यात आले होते. सदर नमुने बर्ड फ्लू (AVIAN INFLUENZA H5N1) पॉझिटिव्ह आल्यामुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष यांनी या आजाराचा प्रसार होऊ नये, याकरिता मांगली गावाच्या १० कि.मी. त्रिज्येतील क्षेत्र 'सतर्कभाग' (Alert Zone) म्हणून घोषित केला आहे. तसेच सदर परिसरात पुढीलप्रमाणे आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी प्रशासनास निर्देश दिले आहे.

बाधित क्षेत्रात मांगली, गेवर्लाचक व जुनोनाटोली येथील कुक्कुट पक्षी जलद प्रतिसाद दलामार्फत शास्त्रोक्त पदध्दतीने संसर्गाचा प्रसार होऊ नये म्हणून प्रभावित पक्ष्यांना मारण्याची क्रिया तातडीने करण्यात येणार आहे. तसेच मृत पक्ष्यांना मार्गदर्शक सुचनेनुसार विल्हेवाट करण्यात येणार आहे. बाधित क्षेत्रातील उर्वरित पशुखाद्य, अंडी, इत्यादीचे शास्त्रोक्त पध्दतीने नष्ट करून विल्हेवाट लावण्यात येणार आहे. प्रभावित क्षेत्राच्या ठिकाणी वाहनांच्या ये- जा करण्यास मनाई करण्यात आली असून त्या ठिकाणची खाजगी वाहने प्रभावीत परिसराच्या बाहेर लावण्याबाबत आदेशित केले आहे. तसेच प्रभावित क्षेत्रात जिवंत व मृत कुक्कुट पक्षी, अंडी, कोंबडीखत, पक्षीखाद्य, अनुषंगिक साहित्य व उपकरणे इत्यादिच्या वाहतूकीस मनाई करण्यात आली आहे. प्रभावित पोल्ट्री फार्मच्या परिसरात नागरिकांच्या हालचालीस, तसेच इतर पक्षी आणि प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात आले आहे. प्रभावित पोल्ट्री फार्मचे प्रवेशद्वार आणि परिसर २ टक्के सोडियम हायपोक्लोराईट किंवा पोटॅशियम परमॅग्नेटने निर्जंतुकीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रभावित क्षेत्राच्या ५ कि.मी. त्रिज्येतील परिसरात कुक्कुट पक्ष्यांची खरेदी-विक्रीची दुकाने व कुक्कुट मांसाची (चिकन) दुकाने, वाहतूक, बाजार व यात्रा / प्रदर्शन, इत्यादी बाबी बंद राहतील.नागरिकांना आवाहन : उकडलेली अंडी व शिजविलेले चिकन खाणे मानवी आरोग्यास पूर्णपणे सुरक्षित आहे. त्यामुळे बर्ड फ्लू रोगाबाबत नागरिकांनी अनावश्यक भीती बाळगू नये. तसेच अफवा व गैरसमज पसरवू नये. तसेच जिल्ह्यात कोठेही पक्ष्यांमध्ये असाधारण मरतुक आढळून आल्यास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये किंवा १९६२ या टोल फ्री दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. आणि पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. मंगेश काळे यांनी केले आहे.



## भीम टायगर सेनेची वैद्यकीय महाविद्यालयासाठी मागणी



**वर्धा । प्रतिनिधी**

२७ मे २०२३ वर्धा जिल्ह्यात होणारे सरकारी वैद्यकीय महाविद्यालय वर्धा शहरात स्थापन करण्यात यावे, तसेच या महाविद्यालयाला 'रमाबाई भीमराव आंबेडकर' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी भीम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष विशाल रामटेके यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,राज्याचे उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे राज्यपाल यांना पाठवण्यात आले आहे.महाविद्यालय वर्धा शहरात उभारण्यात आल्यास स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध होतील आणि जिल्ह्याच्या आरोग्यसेवांमध्ये मोठा बदल घडेल, असे मत रामटेके यांनी व्यक्त केले आहे.

## मिशन समृद्धीच्या उल्हास ट्रस्टकडून शिष्यवृत्ती वाटप




**वर्धा । प्रतिनिधी**

मिशन समृद्धीच्या उल्हास ट्रस्ट, चेन्नई यांच्या वतीने बोधिसत्व विद्यालय, अडेगाव येथे इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रेरणा देण्यासाठी विविध सत्रे घेतली गेली.

कार्यक्रमात इयत्ता आठवीतील प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांना उल्हास ट्रस्टच्या सामाजिक दायित्व निधीतून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये ध्रुव आत्राम, गायत्री ठाकरे, साक्षी सराटे, खुशी डुकरे आणि अक्षरा लोखंडे यांचा समावेश होता.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## सालोड (हि) येथे आरोग्य तपासणी व मोफत औषध वितरण शिबिर संपन्न



**सालोड (हि) । प्रतिनिधी**

स्व. डॉ. अनिल चोरे यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने त्यांच्या कन्या डॉ. मयुरी अनिल चोरे यांच्या वतीने आरोग्य तपासणी व मोफत औषध वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. वडिलांच्या सेवाभावी दृष्टिकोनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत डॉ. मयुरी चोरे यांनी गावासाठी या उपक्रमाचे आयोजन केले. शिबिरात गावातील ४३५ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. यावेळी सरपंच अमोल कन्नाके, उपसरपंच आशिष कुचेवार, अलकाताई चोरे, संदीप रघाटाटे, संजीव वाघ तसेच डॉ. मयुरी चोरे, डॉ. अभय मोहिते, डॉ. भाग्यश्री मोहिते, डॉ. मेघशाम पहाडे, डॉ. पूजा चांडक आणि डॉ. प्रांजली चौधरी यांची विशेष उपस्थिती होती.ग्रामपंचायतीच्या वतीने सर्व डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. गावकऱ्यांनी डॉ. मयुरी चोरे व चोरे कुटुंबाचे गावाशी नाळ जुळवून ठेवत सेवाभावी कार्य केल्याबद्दल विशेष आभार मानले.

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेऊन स्वत:ला सिद्ध करावे-जयंत टेमुर्डे

**भद्रावती । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकरी हे ज्ञानाचे भंडार आहे. ते शिक्षणाने जरी कमी असले तरी जीवनविषयक ज्ञान आणि जाणिवा त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात असते. महाविद्यालयात केवळ पुस्तकी ज्ञान प्राप्त होते. जीवनात कसे जगावे हे कौशल्य शेतकऱ्यांकडे आहे. पुढे खेड्याकडे आल्याशिवाय पर्याय नाही. शेतकरी आणि शेतीला महत्त्व येईल असे विचार

विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे उपाध्यक्ष जयंत टेमुर्डे यांनी व्यक्त केले. ते स्थानिक विवेकानंद महाविद्यालयाच्या मोरवा येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप करताना अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. यावेळी मंचावर डॉ. खत्री महाविद्यालय,तुकूम, चंद्रपूरचे प्राचार्य डॉ. जनार्दन काकडे, सामाजिक कार्यकर्ते प्रा. धनराज आस्वले, सरपंच कवडूजी भोगेकर, प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे, मुख्याध्यापक श्रीराम उपासे, जागतिक किर्तीचे चित्रकार प्रल्हाद ठक, पेवरा येथील माजी सरपंच वासुदेवजी भोगेकर, धर्माजी बोथले, डॉ .जयवंत काकडे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मुख्य अतिथी म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. जनार्दन काकडे यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना शिबिर म्हणजे संस्कारशील नागरिक घडविणारे संस्कार केंद्र आहे. या शिबिरातून भावी सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक, राष्ट्रप्रेमी



नागरिक घडत असतात. म्हणून शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी जीवनात एकदा तरी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सहभागी होऊन माणूस बनण्याचे संस्कार आत्मसात केले पाहिजे असे मत व्यक्त केले.प्रा. धनराज आस्वले यांनी आपले जीवनविषयक अनुभव कथन करीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आयुष्यात यशस्वी होण्याच्या संधी कथन केल्या. प्राचार्य डॉ नामदेव उमाटे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्वतः ला कमजोर समजू नये असे सांगितले.दि.२८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या कालावधीत संपन्न झालेल्या या शिबिरात ५० पेक्षा जास्त विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ.जयवंत काकडे, संचालन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. गजानन खामनकर, आभार प्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश पारेलवार यांनी केले. संस्थाध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे, सहसचिव राजू गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या शिबिराच्या यशस्वितेसाठी मोरवा येथील ग्रामस्थांनी आणि महाविद्यालयातील शारिरीक शिक्षण विभागाच्या संचालक प्रा.संगिता बांबोडे, संजय तामगाडगे अथक परिश्रम घेतले.

## स्कुल बस अघातात पोलिस विभाग अपयशी !

## महिमाच्या मृत्यू प्रकरणात दोषी संस्था चालकास अटक करण्यास टाळाटाळ;आज पून्हा गावकर्यांचा रास्ता रोको

**उमरखेड । प्रतिनिधी**

दुदैवी मृत्यू पावलेल्या स्कुल बस अपघातात 'महिला ' ला न्याय मिळावा यासाठी ठिय्या आंदोलन - रास्ता रोको आंदोलन करण्यात आले मात्र अद्यापही दोषी असलेल्या संस्था चालकास पोलिस विभाग पकडण्यात अपयशी ठरला असून पुन्हा एकदा उद्या दिनांक ५ फेब्रुवारी रोजी पालकवर्गाकडून पळशी फाटा येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे .

२५ जानेवारी रोजी झालेल्या स्कूलबस दुर्घटनेमध्ये महिमा अप्पाराव सरकाटे या विद्यार्थिनींचा मृत्यू झाला व २५ ते ३० विद्यार्थी जखमी झाले . यावर पोलिसांनी बस चालक प्रकाश घाडगे संस्थाचालक दर्शन अग्रवाल व मुख्याध्यापकावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल केला या चालकाला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी भेटली तर संस्थाचालक दर्शन अग्रवाल यांना अजूनही अटक केली नाही .सदर स्कूल बस आरटीओच्या अहवालानुसार कोणतेही कागदपत्र नव्हते व गाडी मालकाचा सुद्धा पुरावा नसल्यामुळे या अपघातास संस्थाचालक दर्शन अग्रवाल कारणीभूत असल्यामुळे त्यांना अटक करावी अशी पालकांची व मृत्यू पावलेल्या महिमाच्या नातेवाईकांची मागणी होती यासाठी शाळेसमोर ठिय्या आंदोलन विविध



संघटनांनी निवेदने व पालक व दिवस पिंपरी येथील नागरिकांनी केलेल्या रास्ता रोको आंदोलनात पोलिसाच्या निष्क्रियतीमुळे दर्शन अग्रवाल यांना अटक केली नसल्यामुळे त्यांना अटक करावी या मागणीची निवेदन उपविभागीय पोलीसीं अधिकारी यांना दिवस पिंपरी येथील पालकांनी गावकऱ्यांनी व महिलांनी आज दिले आहेत . ४ फेब्रुवारी रात्री दुपार बारा वाजेपर्यंत दर्शन अग्रवाल यास अटक न केल्यास बुधवारी सकाळी ११ वाजता पुन्हा पळशी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा यावेळी आंदोलन कर्त्यांनी दिला आहे . या केसच्या संदर्भात आज संस्था चालक दर्शन अग्रवाल यांनी बेल साठी पुसद न्यायालयात धाव घेतली होती परंतु आज आक्षेप आल्यामुळे पोलिसांची तारांबळ उडाली त्यांनी वेळेवर त्यांचा से बदलू न आणला न्यायालयाने त्यांच्या बेलवर ७ फेब्रुवारीला सुनावणी ठेवण्यात आली आहे हे विशेष .या अपघात प्रकरणात संस्था चालकास अटक करण्यासाठी टाळाटाळ होत असल्याने या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा संशय असून पोलिस दबावाखाली तर नाही ना? असा संशयही पालकवर्गांनी व्यक्त केला आहे

## पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाचा आढावा

# अल्पसंख्याक विभागाच्या योजना तळागाळापर्यंत पोहचवा-प्यारे जिया खान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यात 'सबका साथ, सबका विकास आणि सबका प्रयास' हे ध्येय ठेवून काम करायचे आहे. शासन अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी निधी उपलब्ध करून देते, मात्र बहुतांश योजनांची माहिती या समाजाला नाही. त्यामुळे समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अल्पसंख्याक विभागाच्या योजना तळागाळापर्यंत पोहचवा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) प्यारे जिया खान यांनी केले.अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी पंतप्रधानांच्या नवीन १५कलमी कार्यक्रमाचा जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त विपीन पालीवाल, अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू, प्रकल्प संचालक (जिग्राविय) गिरीश धायगुडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळूंके, शिक्षणाधिकारी (माध्य.) राजेश पाताळे, अश्विनी सोनवणे (प्राथ.), सहायक आयुक्त समाजकल्याण विनोद मोहतुरे, सहायक आयुक्त कौशल्य विकास भैयाजी येरमे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राजू नंदनवार आदी उपस्थित होते.

अल्पसंख्याक समाजामध्ये केवळ मुस्लीमच नाही तर बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख व इतर धर्मांचाही समावेश होतो, असे सांगून श्री. खान म्हणाले, या विभागासाठी सरकारकडून जो निधी मिळतो, तो तळागाळातील लोकांपर्यंत पोहचला पाहिजे. केवळ धार्मिक शिक्षणामुळे समाजाचा किंवा देशाचा विकास होणार नाही, तर आधुनिक शिक्षणामुळेच देशाचे निर्माण होईल. त्यामुळेच मदरस्यांचे आधुनिकीकरण ही योजना सुरू आहे. मदरस्यांमध्ये उर्दुसोबतच, हिंदी, इंग्रजी, मराठी व इतर भाषा शिकविणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रगती नाही. शिक्षणावर जास्त लक्ष केंद्रीत करणे आवश्यक असून सरकारकडून निधी घेणा-या अल्पसंख्याक



शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीसुविधा असायलाच पाहिजे. या सोयीसुविधांची पाहणी दोन्ही शिक्षणाधिका-यांनी करावी. तसेच उर्दु शाळांमध्ये शिकविणा-यांची डिग्री व मस्टर तपासावे. अल्पसंख्याकाच्या खाजगी शाळांमध्ये जास्त शैक्षणिक फी आकारण्यात येत असेल तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करा.अल्पसंख्याक समाजाच्या प्रगतीकरीता पात्र लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून द्या. आतापर्यंत किती लाभार्थ्यांना किती रकमेचे कर्ज वाटप झाले आहे, त्याचा अहवाल सादर करावा. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून द्यावे. वक्फ बोर्डानेसुध्दा आपल्या कामात सुधारणा करावी, अशाही सुचना प्यारे जिया खान यांनी दिल्या.पंतप्रधानाचा नवीन १५ कलमी कार्यक्रम : १. एकात्मिककृत बालविकास सेवांची समन्याय उपलब्धता २. शालेय शिक्षण प्रवेश सुधारणे, सर्व शिक्षा अभियान ३. उर्दु शिकविण्यासाठी अधिक संसाधने ४. मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण ५. अल्पसंख्याक समुदायातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती ६. मौलाना आझाद शिक्षण माध्यमातून शैक्षणिक पायाभुत सुविधा ७. गरिबांसाठी स्वयंरोजगार व दैनिक रोजंदारी, स्वर्णजयंती ग्राम व शहरी स्वयंरोजगार योजना ८. तंत्र शिक्षणाच्या माध्यमातून कौशल्य वृध्दी ९. आर्थिक कार्यक्रमाकरीता कर्जाचे पाठबळ वाढविणे १०. राज्य आणि केंद्र सेवाभरती ११. ग्रामीण गृहनिर्माण योजनेमध्ये समतोल वाटा १२.अलसंख्याकांच्या झोपडपट्टी भागातील स्थितीत सुधारणा १३. जातीय घटनांचे प्रतिबंध १४. सांप्रदायिक गुन्ह्यांसाठी अभियोजन १५. जातीय दंगलीच्या बळींचे पुनर्वसन.